# महापालिका निवडणुका महायुती स्वतंत्र लढणार का ?

## भाजप नेते रविंद्र चव्हाणांनी दिले उत्तर

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

महाराष्ट्रातील भाजपने महाविजयापाठोपाठ मराठा कार्ड खेळत रवींद्र चव्हाण यांची पक्षाच्या नवीन कार्याध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. रवींद्र चव्हाण हे मागील सरकारमध्ये मंत्री होते. ते मुंबईतील डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. नुकतेच पक्षाने चव्हाण यांना राज्यातील संघटना निवडणुकीचे प्रभारी बनवले होते. शिर्डी येथील दोन दिवसीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी झालेल्या चर्चेनंतर रवींद्र चव्हाण यांची कार्याध्यक्षपदी नियुक्ती झाल्याची घोषणा पक्षाने केली. यानंतर आज त्यांनी साम मराठीच्या ब्लॅक अँड व्हाईट या कार्यक्रमात मुलाखत दिली आहे. यात त्यांनी अनेक विषयांवर चर्चा केली आहे.

यावेळी बोलताना भाजप नेते रवींद्र चव्हाण म्हणाले की, भाजपमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला संघटनात्मक पद मिळावं, यासाठी त्याची नेहमीच धडपड सुरू असते. जेव्हापासून पक्षाच्या कामाला सुरूवात केली तेव्हापासून असा विचार केला संघटनात्मक कामात फार रूची असल्याने हे करताना वेगळा आनंद होतो. नेत्यांसोबत असणारे संबंध आणि केंद्रिय नेतृत्वाचे दिले जाणारे काम करताना कार्यकर्त्याला वेगळा आनंद असतो. त्यामुळे माझ्यासारख्या नेत्याला मंत्रीपदापेक्षा संघटनात्मक पदाचा आनंद असतो, असं त्यांनी सांगितलं आहे. ते म्हणाले की, महाराष्ट्राच्या जनतेने महायुतील बहुमत दिले आहे. जे याआधी मिळाले नव्हते. त्यामुळे आता जनेतेच्या सरकारकडून फार अपेक्षा आहेत. सरकार आणि संघटना दोन्ही गोष्टी एकत्र चालणं गरजेचं असतं. प्रत्येक योजना जनतेपर्यंत गेल्या पाहिजेत. केंद्र आणि राज्य ज्या पद्धतीने नियोजन करत आहे, ते जनतेसाठी आहे. नरेंद्र मोदींची धडपड जनता पाहत आहे. महापालिका निवडणुका महायुती एकत्र लढणार का, या प्रश्नाचे उत्तर देताना त्यांनी सांगितले की, माझे आणि एकनाथ शिंदेंचे चांगले संबंध आहेत. आम्ही अनेक वर्षांपासून एकत्र काम करत आहोत. आमच्या दोघांत कधीही वाद झाले नाहीत. महायुतीचा निर्णय वरिष्ठ घेतात. त्यांचा निर्णय आमच्यासाठी महत्त्वाचा असतो. महापालिका निवडणुकीचा निर्णयही वरिष्ठ मंडळी घेतील, असं ते म्हणाले आहेत.

# "विद्यापीठे आणि इन्क्युबेटर्स हे नोकरी शोधणारे नव्हे तर निर्माण करणारे बनवणार" -मुख्यमंत्र्यांची ग्वाही

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

विद्यापीठे आणि इन्क्युबेटर्स महाराष्ट्राच्या नवकल्पना स्टार्टअपला बळकटीकरण देणाऱ्या संस्था आहेत. ग्रामीण भागातील नव कल्पना असलेल्या तरुणांनाचा उद्योगात सहभाग वाढवणार असून उद्योजकांना मार्गदर्शन, नेटवर्किंग, कायदेशीर सहाय्य इत्यादी सेवा देणाऱ्या इन्क्युबेटर्सना स्टार्टअप सुरू करण्यासाठी सहकार्य करणार. शासकीय आणि खाजगी विद्यापीठे या भविष्यातील स्टार्टअपला बळकटीकरण देणाऱ्या संस्था आहेत. विद्यापीठे आणि इन्क्युबेटर्स हे नोकरी शोधणारे नव्हे तर निर्माण करणारे बनवणार अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने एम्पॉवरींग इनोव्हेशन, एलिव्हेटिंग महाराष्ट्र (Empowering Innovation,Elevating Maharashtra) या संकल्पनेवर आधारित 'राष्ट्रीय स्टार्टअप दिवस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. ते म्हणाले की, सिडबी (SIDBI) स्मॉल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया) कडून स्टार्ट अपसाठी दोनशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक प्रादेशिक विभागाला तीस कोटी रुपयांची तरतूद करणार आहे.



काळाची गरज ओळखून स्टार्ट अप धोरणाचा नवीन मसुदा तयार केला आहे. उद्योजकांना सूचनांसाठी हा मसुदा उपलब्ध करून देण्यात आला आहे हे देशातील आधुनिक धोरण ठरणार तसेच राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करणार आहे असं त्यांनी घोषित केले. तसेच नवं उद्योजक आणि महिला उद्योजकांच्या नवकल्पना सक्षम करून महाराष्ट्राची उन्नती करण्यात येणार आहे. देशात स्टार्टअप सुरू झाले तेव्हा ४७१ स्टार्ट अप होते आज देशात १ लाख ५७ हजार आहेत. महाराष्ट्र केवळ भारताच्या स्टार्टअप क्रांतीत सहभागी नाही तर त्याचे नेतृत्व करत आहे. राज्यात २६००० स्टार्ट अप आहेत. आपण असे अभियान राबवित आहोत की ज्यामध्ये महिला स्टार्टअप मध्ये सर्व पदांवर असतील. देशात जास्त महिला डायरेक्टर असलेले महाराष्ट्र हे पहिलं राज्य आहे. स्टार्टअपमध्ये महाराष्ट्र पहिल्या सात राज्यात आहे असंही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. दरम्यान, उद्योजक, दूरदर्शी गुंतवणूकदार,धोरणकर्ते, इन्क्युबेटर्स, विद्यापीठे हे उद्योग क्षेत्रातील बदलाचे प्रणेते आहेत. इज ऑफ डूईंग बिझनेसमुळे उद्योग कमी वेळात सुरू करण्यामध्ये पारदर्शकता आली आहे. गुंतवणुकीत महाराष्ट्र राज्य हे देशात पहिले आहे. भविष्यातही मानवी हस्तक्षेप न ठेवता पारदर्शक पद्धतीने उद्योजकांना राज्यात शासनाबरोबर उद्योग सुरू करण्याची संधी प्राप्त करून दिली जाणार आहे. उद्योग सुरू करताना मुंबई पुणे मध्ये पोषक वातावरण आहे. मुंबई निधीमध्ये आघाडीवर असून पुणे तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचे केंद्र आहे. आपली टियर-२ आणि टियर-३ शहरे महाराष्ट्राच्या विकासात मोठा हातभार लावत आहेत. नाशिक, नागपूर, औरंगाबाद आणि कोल्हापूर ही शहरे स्टार्टअप्सना प्रोत्साहन देत आहेत आणि इकोसिस्टम निर्माण करतात असं फडणवीसांनी सांगितले.

# प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात मुंबईकरांना मानाचे पान, पाच पाहुण्यांना विशेष निमंत्रण

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

यंदा २६ जानेवारी रोजी नवी दिल्ली येथील कर्तव्य पथ येथे प्रजासत्ताक दिनाच्या परेडचे साक्षीदार होण्यासाठी मुंबईतील पाच विशेष पाहुण्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. या परेडमध्ये देशभरातून १० हजार, तर महाराष्ट्रातून २३ विशेष पाहुणे उपस्थित राहणार आहेत. त्यामध्ये पाच मुंबईकरांना हा मान मिळणे अभिमानाची गोष्ट आहे, असे अतुल जाधव या निमंत्रितांपैकी एक असलेल्या तरुणाने म्हटले आहे. मुंबई विभागातून अँटॉप हिल येथील अतुल जाधव, वसई पश्चिम येथील वैभव पाटील यांची पंतप्रधान यशस्वी योजनेच्या श्रेणीतून निवड झाली आहे. राष्ट्रीय पातळीवर विशेष गुणांसह नामांकित शैक्षणिक संस्थांमधील गुणवंतांची पंतप्रधान यशस्वी योजनेतून निवड केली जाते, तर पद्मश्री ब्रह्मदेव पंडित आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेते अभय ब्रह्मदेव पंडित या पिता-पुत्रांना महाराष्ट्र टेक्सटाईल (हस्तकला) श्रेणीअंतर्गत आमंत्रित केले आहे. तसेच बदलापूर पश्चिम येथील अंगणवाडी सहायक आयुक्त उज्ज्वला पाटील यांना डब्ल्यूसीडी या श्रेणीअंतर्गत आमंत्रित करण्यात आले . मुंबईतील अंगणवाड्यांत लसीकरण ते पोषण आहारापर्यंत सर्व उपक्रमांत उत्कृष्ट अंमलबजावणी केल्यामुळे आमच्या विभागाचे कौतुक होते. प्रजासत्ताक कार्यक्रमासाठी माझे नाव सुचविल्याबद्दल मला अभिमान आहे, असे एकात्मिक बाल विकास योजना सेवा सहायक आयुक्त पदावर कार्यरत उज्ज्वला पाटील यांनी नमूद केले. प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याचे आमंत्रण मिळणे ही आमच्या सर्व कुटुंबासाठी अभिमानाची गोष्ट आहे. हा पूर्ण हस्तकला क्षेत्राचा सन्मान असून संचालन प्रत्यक्ष पाहण्याची अनेक वर्षांपासूनची इच्छा आता पूर्ण होत आहे, अशी प्रतिक्रिया ब्रह्मदेव पंडित आणि अभय पंडित यांनी दिली. माझे गाव सोकासन असून ते सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात वसलेले आहे. मी मध्यमवर्गीय कुटुंबातील असून माझे आई-वडील गावी शेती करतात. तिरूचिरापतल्ली येथील आयआयएममध्ये एमबीएसाठी प्रवेश घेताना सामायिक परीक्षेत ९८टक्के गुण मिळाले होते. त्याआधारे महाविद्यालयाने माझे नाव पाठविले होते.

पीएम यशस्वीसाठी २० जणांमधून माझी निवड झाली, पण त्यानंतर प्रजासत्ताक दिनाचे निमंत्रण येईल असे वाटले नव्हते, असे अतुल जाधव यांनी सांगितले.

# अब तक 100 पार... सराईत गुन्हेगार ठरला सामान्य नागरिकांसह पोलिसांची डोकेदुखी

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

कामानिमित्त घराबाहेर पडलेल्या एखाद्याच्या पाठीवर अचानक थाप पडते. अरे, ओळखलं नाहीस का? किंवा पहचाना नाही? मी रमेश.. सुरेश.. किंवा मै अक्रम.. अशी अगदी ओळखीची नावे सांगून संवाद सुरू होतो. पुढे, बोलण्यात गुंतवून हाच तोतया हातचलाखीने किमती ऐवजावर हात साफ करून परागंदा होतो. अब तक १०० पार... गुन्हे केलेला पोलिस अभिलेखावरील सराईत बोलबच्चन गुन्हेगार नरेश जयस्वाल (४४) हा सामान्य नागरिकांसह पोलिसांची डोकेदुखी ठरला आहे. पोलिसांनी ९१ वेळा त्याच्या मुसक्या आवळून गजाआडसुद्धा केले. पण, जामिनावर बाहेर पडताच तो पुन्हा नवीन सावज शोधतो.

मूळचा चेंबूरचा रहिवासी असलेल्या नरेश विरुद्ध मुंबईसह ठाणे, नवी मुंबईत गुन्हे नोंद आहेत. कारागृहातून सहा महिन्यांनी तो बाहेर पडला. २२ डिसेंबर रोजी त्याने मानखुर्दमध्ये रमेश पोळ यांना बोलण्यात गुंतवून हातचलाखीने त्यांच्या गळ्यातील दीड तोळ्याची सोनसाखळी लंपास केली. मानखुर्द पोलिस ठाण्यातील सहायक पोलिस निरीक्षक गणेश वाघ यांच्यासह गुन्हे प्रकटीकरण पथकाने सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने तपास सुरू केला.

तपासात २०१९ मध्ये अटक केलेला नरेश जयस्वालच असल्याचे स्पष्ट होताच, त्यांनी शोध सुरू केला. तो सतत लोकेशन बदलत होता. कल्याण, उल्हासनगर, वाशी, बेलापूर अशा विविध लॉजमध्ये थांबून तो लपत होता. अखेर, गुप्त माहितीदारांच्या मदतीने त्याला मानखुर्दमधून बेड्या ठोकल्या. त्यावेळीही त्याने पथकावर चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

**गंभीर आजाराची त्यांनाही भीती...**

अटक केल्यानंतर गंभीर आजाराचा फायदा घेत अधिकाऱ्यांवर थुंकणे, जीभ चावून रक्ताची थुंकी अंगावर टाकण्याची धमकी देणे, तेथेच शौच करण्यासारखे प्रकार करून तो तपासाला सहकार्य करत नाही.

**बार गर्ल्स अन् नशा**

बार गर्ल्ससह नशेचा नाद असल्याने ठगीचे पैसे त्यात उडवत होता. ओळखीच्या व्यक्तीसह सोनारालही घरातील मंडळी आजारी असल्याचे सांगून या वस्तू मार्गी लावतो.

**जामिनावर येताच पुन्हा गुन्हा**

सहा महिन्यांनी कारागृहातून जामिनावर बाहेर पडून त्याने दुसरा गुन्हा केला. त्याला अटक झाल्यानंतर त्याची पत्नी त्याला बाहेर काढते. त्याचा भाऊ रमेश हा देखील महाठग असून त्याच्याविरुद्धही ८ ते १० गुन्ह्यांची नोंद आहे. तोही सध्या कारागृहात आहे.

**पण मुलांना शिकवलं...**

त्याचा मुलगा डिप्लोमा तर मुलगी दहावीचे शिक्षण घेत आहे. दोघेही आईसोबत राहतात. नरेश मानखुर्दमध्ये भाड्याच्या घरात राहायचा.

जयस्वाल विरुद्ध २०१० पासून गुन्ह्यांची नोंद आहे. १०० हून अधिक गुन्हे त्याच्या विरुद्ध नोंद आहेत. यापैकी ९१ वेळा अटकही झाली. जामिनावर बाहेर पडताच तो दुसरा गुन्हा करायचा. सध्या त्याच्या या वृत्तीमुळे त्याचा जामीनही नाकारला आहे. त्यामुळे तुमच्याही पाठीवर अशी अनोळखी थाप पडल्यास वेळीच सावध होणे गरजेचे असल्याचे मानखुर्द पोलिसांनी सांगितले.

# टोरेस प्रकरणी 'व्हिसलब्लोअर'ला सुरक्षा द्या! उच्च न्यायालयाचे टोरेस तपासप्रकरणी ताशेरे

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

टोरेस गुंतवणूक घोटाळ्यातील संथ तपासाबद्दल बुधवारी मुंबई पोलिसांना उच्च न्यायालयाने चांगलेच फटकारले. तसेच, या प्रकरणात 'व्हिसलब्लोअर' असल्याचा दावा करणाऱ्या चार्टर्ड अकाउंटंटला (सीए) संरक्षण देण्याचे आदेश पोलिसांना दिले. न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि नीला गोखले यांच्या खंडपीठाने सीए अभिषेक गुप्ता यांना सुरक्षा पुरवण्याचे निर्देश पोलिस आयुक्तांना दिले. गुप्ता यांनी हा घोटाळा उघड केल्याचा दावा केला आहे, तर त्यांना काही धोका आहे की नाही, हे तपासत असल्याचे पोलिसांनी न्यायालयाला सांगितले. यासंदर्भात गुप्ता यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने हा आदेश दिला.

**आरोपी भारतातून पळाले**

सुनावणीदरम्यान, ईओडब्ल्यूसारखी 'विशेष' एजन्सी कशी मागे पडली, याबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. तसेच, संथ तपासामुळे परदेशी आरोपींना भारतातून पळून जाण्याची संधी मिळाल्याचा ठपका न्यायालयाने ठेवला. यासंदर्भात निरीक्षण नोंदवताना न्यायालयाने म्हटले की, तपासाची प्रगती होत नसल्याबद्दल आम्हाला आश्चर्य वाटते, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

**बळीचा बकरा बनवू नका...**

गुप्ता यांनी टोरेस ब्रँड्सची मूळ कंपनी प्लॅटिनम हर्न प्रायव्हेट लिमिटेडच्या खात्यांचे ऑडिट केले होते. गुंतवणूकदारांनी तक्रार दाखल करण्यापूर्वी जून २०२४ मध्ये पोलिसांना कथित घोटाळ्याची माहिती देण्यात आली होती, परंतु कोणतीही कारवाई केली नाही, असा दावा गुप्ता यांनी केला आहे. त्यामुळे जर एखादी व्यक्ती पोलिसांना माहिती देत असेल, तर त्याला बळीचा बकरा बनवू नये, असे न्यायाधीशांनी खडसावले.

**आतापर्यंत २५ कोटी वसूल**

पोलिसांनी घोटाळ्याची रक्कम वसूल करण्यासाठी पावले उचलली असून, आतापर्यंत २५ कोटी रुपये वसूल केले असल्याची माहिती पोलिसांनी दिली. मात्र, ही संपूर्ण वसुली घोटाळ्याच्या रकमेच्या एक टक्काही नसल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. तर, सीसीटीव्ही फुटेजसारखे महत्त्वपूर्ण पुरावे मिळवण्यात पोलिसांना अपयश आल्याबद्दलही न्यायालयाने ताशेरे ओढले आहेत. याप्रकरणी आता ईओडब्ल्यूच्या सहायक पोलिस आयुक्तांना २२ जानेवारी रोजी होणाऱ्या सुनावणीला व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित राहण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.


ANAND RATHI
आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई – ४०००६३ भारत
Mobile: +91-8451942710 | Website: www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे सामान्यतः जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई–लिलावाद्वारे https://sarfaesi.auctiontiger.net वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नावः (१) एम/एस द एमडब्ल्यू ग्रुप (कर्जदार) फ्लॅट क्रमांक ४०३, अ विंग, इमारत क्रमांक १, बालाजी कॉम्प्लेक्स, स्वामी समर्थ मठ, नांदिवली, डोंबिवली पूर्व ४२१२०१. | |
| सह–कर्जदाराचे नावः (२) श्री. जनार्दन पी अमीन (सह–कर्जदार) फ्लॅट क्रमांक ४०३, ए विंग, इमारत. क्रमांक १, बालाजी कॉम्प्लेक्स, स्वामी समर्थ मठ, नांदिवली, डोंबिवली पूर्व ४२१२०१ (३) श्रीमती प्रमिला जनार्दन अमीन (सह–कर्जदार) फ्लॅट क्रमांक ४०३, ए विंग, इमारत. क्रमांक १, बालाजी कॉम्प्लेक्स, स्वामी समर्थ मठ, नांदिवली, डोंबिवली पूर्व ४२१२०१ | |
| वेळापत्रकः १. फ्लॅट क्रमांक ४०३, ०४ वा मजला, ए विंग, इमारत क्रमांक ०१, बालाजी कॉम्प्लेक्स सीएचएसएल, नांदिवली, सेव्हन सिस्टर्स रोड, एस. क्रमांक १२, एच क्र ३अ गाव नांदिवली पंचानंद, डोंबिवली पूर्व, जिल्हा – ठाणे, ४२१२०१, आणि २. फ्लॅट नं. १०६, ०१ ला मजला, ई विंग, रामचंद्र पार्क सीएचएसएल, पवार नगर, नांदिवली, एस नं. ६८, एच. क्र. पी गाव नांदिवली तर्फे पंचनंद, डोंबिवली पूर्व, जिल्हा–ठाणे, ४२१२०१ | |
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | रु. ४१, ११,६७४/– (रुपये एकचाळीस लाख अकरा हजार सहाशे चौहत्तर फक्त). |
| लिलावाची तारीख | ३ फेब्रुवारी २०२५ |
| राखीव किंमत | फ्लॅट क्र. १०६–रु. १५,५५,२००/– (रुपये पंधरा लाख पंचावन्न हजार दोनशे फक्त) फ्लॅट क्रमांक ४०३–रु. ४०,५६,८८५/– (रुपये चाळीस लाख छप्पन हजार आठशे पंच्यांशी फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किंमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. १०,०००/– |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | २७ जानेवारी २०२५ सकाळी १० ते दुपारी ४ वा |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | ३१ जानेवारी २०२५ दुपारी ४.०० पर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | ३ फेब्रुवारी २०२५ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० दरम्यान |
| टीपः इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात. | |

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली १५ दिवसांची नोटीस देखील आहे.
तारीखः १६ जानेवारी २०२५ एसडी/– आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाणः ठाणे अधिकृत स्वाक्षरी


# कऱ्हाडे ब्राम्हण संघाचा शतकोत्सव शुभारंभ रविवारी 19 जानेवारीपासून

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

१९२५ साली विजया दशमीच्या सुमुहूर्तावर आत्मोन्नती मंडळाच्या माध्यमातून गिरगावातील कऱ्हाडे ज्ञाती बांधवांची एक सभा श्री. भालचंद्र कृष्ण भाटवडेकबूर यांच्या दिवाणखान्यात संपन्न झाली, या सभेत कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईची स्थापना करण्यात आली होती. कऱ्हाडे ज्ञातीबांधवांसाठी स्थापन झालेली ही पहिली संस्था आहे. या संस्थेच्या सहकार्यातून आणि प्रेरणेतूनच पुढे वेगवेगळ्या शहरांत ज्ञातीबांधवांच्या जवळपास ३२ संस्था देशस्तरावर निर्माण झाल्या आहेत. ज्या महासंघाच्या माध्यमातून आज कार्यरत आहेत.

ज्ञाती बांधवांचे आशीर्वाद, कार्यकर्त्यांनी निरपेक्ष बुद्धीने केलेली सेवा आणि सढळ हस्ताने संघासाठी अनेकांनी दिलेले आर्थिक योगदान यामुळेच आज मुंबईचा हा वटवृक्ष गेली ९९ वर्षे खंबीरपणे उभा आहे.

अभिमानाची बाब म्हणजे गेली ९९ वर्षे मुंबई संघ ही कार्ये यशस्वीपणे करीत आहे. एखाद्या संस्थेचे कार्य अशा प्रकारे १०० वर्षे अखंडपणे सुरू रहाणे हे खरोखरच कौतुकास्पद आहे.

अनेक समाज बांधवांच्या जीवनात प्रगती, स्थिरता, आणि आनंद देणाऱ्या संस्थेचा शतक महोत्सव संपन्न व्हावा आणि सभासद बांधवांना त्यात सहभागी होता यावे, हे आपले सर्वांचे भाग्यच आहे. प्रत्येक कार्यकर्त्याला आनंद देणारी, अभिमान वाटणारी अशी ही घटना आहे. हे भाग्य आपण व आपल्या कुटूंबियांनी सहभागी होवून अनुभवावे व या सुवर्ण क्षणांच्या स्मृतींचे प्रत्यक्ष साक्षीदार व्हावे, या साठी वर्षभर कार्यक्रमांचे आयोजन करुन शतकोत्तर कार्यक्रम मोठ्या दिमाखात साजरा होणार आहे. समारंभाची सुरुवात दि.१९ जानेवारी रोजी दादर राजा शिवाजी विद्यालया संकुलाच्या भव्य पटांगणात धार्मिक अधिष्ठानाने होणार असून सायं. ५.०० वा. लिटल चॅंपफेम प्रथमेश लघाटे व मुग्धावैशंपायन-लघाटे यांच्या सुमधूर "अभंगवाणी" या कार्यक्रमाने होणार आहे.

# भावना गवळी यांच्या निकटवर्तीयाची दोषमुक्तीची मागणी फेटाळली

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

शिवसेनेच्या (एकनाथ शिंदे गट) विधान परिषदेच्या आमदार भावना गवळी यांचे निकवर्तीय सईद खान यांची आर्थिक गैरव्यवहार प्रकरणातून दोषमुक्त करण्याची मागणी विशेष न्यायालयाने फेटाळली. 'महिला उत्कर्ष प्रतिष्ठान' नावाच्या संस्थेतील निधीमध्ये अपहार केल्याचा आरोप खान यांच्यावर असून त्यांच्यावर आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल आहे. जामिनावर सुटका झाल्यानंतर, त्यांनी प्रकरणातून दोषमुक्त करण्याच्या मागणीसाठी अर्ज केला होता. त्यात त्यांनी आपण निर्दोष असून कधीही संस्थेचे पदाधिकारी नसल्याचा तसेच संस्थेचे कंपनीत रुपांतरित झाल्यानंतरच आपण अध्यक्ष झाल्याचा दावा केला होता. तथापि, खान यांनी पडद्यामागून भूमिका बजावली असून त्यांच्याविरुद्ध पुरेसे पुरावे आहेत, असे विशेष न्यायालयाचे न्यायाधीश ए. सी. डागा यांनी त्यांची दोषमुक्ती मागणी फेटाळताना प्रामुख्याने नमूद केले. आरोपी हा संस्थेचा पदाधिकारी किंवा प्रभारी नव्हता, मात्र याचा अर्थ असा नाही की पदाधिकारी नसलेली व्यक्ती संस्थेच्या व्यवस्थापनावर नियंत्रण ठेवू शकत नाही. याप्रकरणी पडद्यामागील व्यक्तीला समोर आणणे आवश्यक आहे. या प्रकरणात, अर्जदार पडद्यामागून काम करत असल्याचे पुराव्यांतून दिसते, असे सकृतदर्शनी मतही न्यायालयाने नोंदवले.

# माहीम खाडीतील मृतदेहाप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

माहीम खाडी परिसरात सापडलेल्या मृतदेहाप्रकरणी मुंबई पोलिसांनी गुरुवारी हत्येचा गुन्हा दाखल केला. मृतदेहावर गंभीर जखमा असून त्याचे हात-पाय बांधून फेकण्यात आले होते. प्राथमिक पाहणीत हा हत्येचा प्रकार वाटत असून मृत व्यक्तीची ओळख पटवण्याचे काम सुरू आसल्याचे पोलिसांनी सांगितले. माहीम मच्छीमार कॉलनी परिसरातील रामगड झोपडपट्टीच्या समोर खाडी परिसरात जखमी व्यक्ती असल्याची माहिती माहीम पोलिसांना मिळाली. त्यानुसार बुधवारी सायंकाळी पोलीस पथक घटनास्थळी रवाना झाले. त्यावेळी तेथील पाईप लाईनजवळ एक व्यक्ती पडलेला आढळला. त्याला तातडीने शीव येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात नेण्यात आले. रुग्णालयातील डॉक्टरांनी त्याची पाहणी करून त्याला मृत घोषित केले. प्राथमिक पाहणीत मृत व्यक्तीच्या हाता-पायावर तीक्ष्ण हत्याराने गंभीर जखमा करण्यात आल्या होत्या. त्या व्यक्तीला मारहाण करून हत्याराने वार करण्यात आले होते. त्यानंतर त्याचे हात-पाय टॉवेलने बांधून त्याला पाण्यात फेकण्यात आले, असा प्राथमिक अंदाज आहे. मृतदेहाची ओळख अद्याप पटलेली नाही. पोलीस उपनिरीक्षक मेहबूब पठाण यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला असून परिसरातील सीसी टीव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने तपास करण्यात येत आहे.


बृहन्मुंबई महानगरपालिका
एल. टी. एम. जी. हॉस्पिटल, सायन, मुंबई–४०००२२

**ई–निविदा सूचना**

No. LTMG/EQ-28/T 2024-25
दिनांकः १६/०१/२०२५

ही ई–टेंडर नेटिस आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त (एमसीजीएम) तीन पॅकेट प्रणालींमध्ये खाली दिलेल्या ई–निविदा १ आमंत्रित करतात.

कामाचे नावः सीसीएनपीडब्ल्यूटी बीटा वॉर्ड ड्रेनेज किट (मोठ्या आकाराचे) एलटीएमजी हॉस्पिटलच्या शस्त्रक्रिया विभागासाठी ७५ तुकडे

| अ. क्र | वर्णन | ई निविदा किंमत (रु.) | ईएमडी (रु.) | ऑनलाइन बोली डाउनलोड करण्याची तारीख आणि वेळ | ऑनलाइन बिड सबमिशनची शेवटची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | सीसीएनपीडब्ल्यूटी बीटा वाउंड ड्रेनेज किट (मोठ्या आकाराचे) एलटीएमजी हॉस्पिटलच्या शस्त्रक्रिया विभागासाठी ७५ तुकडे Bid Nc.2024_MCGM_1130666 | १३२०/– अधिक जीएसटी १८% | रु. २०,०००/– | १७/१/२०२५ रोजी ०४.०० वा (१६:०० तास) | २७/१/२०२५ रोजी ०४.०० वा (१६:०० तास) |

निविदांच्या अधिक तपशीलासाठी इच्छुक निविदाकाराने महापालिकेच्या http//www.mcgm.gov.in या वेबसाइटला भेट द्यावी.
निविदा कागदपत्रे पोस्टाने जारी किंवा प्राप्त होणार नाहीत.

PRO/2250/ADV/2024-25
डीन
एलटीएमजी हॉस्पिटल, सायन.



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला,**
**भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
**E-mail-northmumbai.ce@mahapwd.gov.in**
**ई-निविदा सुचना क्र. ४५ सन २०२४-२०२५**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फैक्स क्रमांक २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in व www.mahapwd.com येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, फोर्ट, मुंबई तसेच कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | गोरेगाव (पु) मुंबई येथील १७६ पोलीस निवास्थाने मधील इमारत क्र. २९ अ ची संरचनात्मक दुरुस्तीची कामे करणे. | रु.७८४४३४५/- |
| २ | गोरेगाव (पु) मुंबई येथील १७६ पोलीस निवास्थाने मधील इमारत क्र. २९ ब ची संरचनात्मक दुरुस्तीची कामे करणे. | रु.७९५०६५४/- |
| ३ | गोरेगाव (पु) मुंबई येथील १७६ पोलीस निवास्थाने मधील इमारत क्र. २९ क ची संरचनात्मक दुरुस्तीची कामे करणे. | रु.८०७२५६५/- |
| ४ | गोरेगाव (पु) मुंबई येथील १७६ पोलीस निवास्थाने मधील इमारत क्र. ३८ ब ची संरचनात्मक दुरुस्तीची कामे करणे. | रु.७५०५०१७/- |
| ५ | गोरेगाव (पु) मुंबई येथील १७६ पोलीस निवास्थाने मधील इमारत क्र. ३८ अ ची संरचनात्मक दुरुस्तीची कामे करणे. | रु.७६७४४९७/- |
| ६ | गोरेगाव (पु) मुंबई येथील १७६ पोलीस निवास्थाने मधील इमारत क्र. ३८ क ची संरचनात्मक दुरुस्तीची कामे करणे. | रु.७७३८११६/- |
| ७ | गोरेगाव (पु) मुंबई येथील १७६ पोलीस निवास्थाने मधील इमारत क्र. ३८ ड ची संरचनात्मक दुरुस्तीची कामे करणे. | रु.७७१७६५६/- |

टिप :- वरिल "ई" निविदा सुचना https//mahatenders.gov.in व www.mahapwd.com येथे पहावयास तसेच डाऊनलोड करावयास मिळेल. सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास या वेब साईटवर कळविण्यांत येईल.

**ई- निविदा उपलब्ध कालावधी- दि. १७/०१/२०२५ ते दि. ३१/०१/२०२५ पर्यंत**
**ई-निविदा उघडणे दि. ०३/०२/२०२५ दुपारी १५.०० वाजता.**

जा.क्र. काम/उर्मुवि/निविदा/ २१३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई (सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला, भवन्स कॉलेजजवळ,
दादाभाई मार्ग, अंधेरी (प.) मुंबई ५८. दिनांकः- १३ जानेवारी २०२५

**कार्यकारी अभियंता,**
**उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,**
**अंधेरी, मुंबई.**

डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२४-२५/क्र-५/C५७११